महसूल व वन विभागाच्या अधिपत्याखालील नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, पुणे कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या नोंदणी उप महानिरीक्षक, मुंबई विभाग, मुंबई व सह जिल्हा निबंधक,वर्ग-१, धुळे या कार्यालयांकरिता वाहन खरेदी करण्यास मंजूरी देण्याबाबत................................

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक : वाहनखरेदी-२०१७/२८५/प्र.क्र.७९/२०१७/म-१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : १९ सप्टेंबर, २०१९.

संदर्भ :-

१) शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक - वाहन-२०१६/प्र.क्र.५१/१६/विनियम, दि.२१.०१.२०१७.
२) नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे पत्र जा.क्र.७/वाहन खरेदी-सजिनी/८३/२०१५-१६, दि. १४.०१.२०१६.
३) नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे पत्र जा.क्र.७/वाहन खरेदी-सजिनी/८-१०/२०१६-१७, दि. ०५.०१.२०१७.
४) नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे पत्र जा.क्र.७/वाहन खरेदी/नाउमनिमुंबई/१००/२०१७, दि. ०३.०२.२०१७.

प्रस्तावना :-

नोंदणी व मुद्रांक विभाग हा राज्यासाठी महसूल जमा करणारा महत्वाचा विभाग आहे. या नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक विभागाच्या नियंत्रणाखालील कार्यालयांचे फिरतीच्या कामाचे स्वरुप, त्यांच्या करीता वाहनांची असलेली आवश्यकता विचारात घेता संदर्भाधिन २ ते ४ येथील पत्रान्वये नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक यांनी त्यांच्या अधिनस्त असलेल्या कार्यालयांसाठी वाहन खरेदी करण्याचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे. सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन होता.

-:- शासन निर्णय -:-

नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक यांच्या प्रस्तावास -राज्यस्तरीय वाहन आढावा समितीने◦ मान्यता दिल्याप्रमाणे पुढील तक्त्यात नमुद केलेल्या कार्यालयांकरिता वित्त विभागाच्या संदर्भाधिन क्र.१ वरील दि.२१.०१.२०१७ च्या शासन निर्णयामध्ये नमुद केल्यानुसार २ नविन वाहने प्रत्येकी रु.६.०० लक्ष किंमत मर्यादेत (वाहनाची किंमत + विक्रीकर + टेम्परररी रजिस्ट्रेशन चार्जेस + मुल्यवर्धित कर + सहाय्यभूत साहित्य [Accessories] इत्यादि अंतर्भूत करुन एकूण रु.६.०० लक्षच्या मर्यादेत) खरेदी करण्यास खालील अटींच्या मान्यता प्रदान करण्यात येत आहे:-

अ.क्र.	कार्यालयाचे नाव	मंजूर करण्यात आलेले वाहन
१	नोंदणी उप महानिरीक्षक,मुंबई विभाग,मुंबई	१ कार
२	सह जिल्हा निबंधक,वर्ग-१,धुळे या कार्यालयांकरिता	१ जीप

अटी -

१) राज्यस्तरीय वाहन आढावा समितीने मान्यता दिल्यानुसार अनुज्ञेय नविन वाहन विहित कार्यपध्दतीस अनुसरुन खरेदी करण्यात यावे.

२) वित्त विभागाच्या संदर्भाधिन क्र.१ येथील दिनांक २१.०१.२०१७ च्या शासन निर्णयान्वये विहित रुपये ६.०० लक्षच्या मर्यादेत वाहनांची खरेदी करण्यात यावी. वाहन खरेदीसाठी मंजूर केलेल्या अनुदानामध्ये वाहनाच्या किंमतीत सर्व करांचा समावेश आहे.

३) नविन वाहन ज्या अधिकाऱ्यांना मंजूर करण्यात आले आहे, त्या अधिकाऱ्यांनी सदर वाहनाचा वापर उक्त कार्यालयाच्या शासकीय कामकाजासाठी करावा.

४) नविन वाहन खरेदी केल्यानंतर त्यांची नोंद "महावाहन" प्रणालीवर घेण्यात यावी व त्यांसबंधिचा अनुपालन अहवाल शासनास सादर करण्यात यावा.

०२. याबाबतचा खर्च "मागणी क्र.सी-२, "४०५९-कॅपिटल आऊटले ऑन पब्लिक वर्क्स (२४) (०१) (४०५९ २४९७)- दुय्यम निबंधक कार्यालयामध्ये इमारत बांधकाम" या लेखाशिर्षाखालील उपलब्ध असलेल्या अनुदानामधून भागविण्यात यावा.

०३. सदरचा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.३८३/२०१९/विनियम, दिनांक ३१.०८.२०१९ अन्वये दिलेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदरचा शासन निर्णय डिजीडल स्वाक्षरीने सांक्षांकित करुन काढण्यात येत असून, सदरचा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१९०९१९१९११२६२८१९ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by Tanaji Dhondiram Saravane
Date: 2019.09.19 19:18:05 +05'30'

(ता.धों.सरावणे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य पुणे.
२. प्रधान महालेखापाल (लेखा वअनुज्ञेयता/लेखा परीक्षा) - १, महाराष्ट्र
३. संचालक लेखा व कोषागारे, मुंबई
४. अधिदान व लेखा अधिकारी, वांद्रे, मुंबई
५. जिल्हा कोषागार अधिकारी, धुळे
६. सहसचिव/उपसचिव, वित्त विभाग (कार्यासन व्यय-१०/निनियम)
७. निवड नस्ती, कार्यासन म-१, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.